पुण्य नगरी

# रवळनाथला प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य : प्रांताधिकारी

**चंदगड :** स्थापनेपासूनच सामाजिक बांधिलकी पत्करलेल्या रवळनाथने सहकार क्षेत्रात नवा मानदंड निर्माण केला आहे. त्यामुळे रवळनाथच्या देशभरातील विस्तारात गडहिंग्लज विभागातील सर्वांनी सक्रिय हातभार लावावा. याकामी प्रशासन विभागाचेही सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे यांनी दिली.




**चंदगड : नारायण सुतार यांचा सत्कार करताना प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे. उपस्थित एम. एल. चौगुले, विनोद रणावरे यांच्यासह अन्य.**

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीमार्फत आयोजित पंचाहत्तरी पूर्ण केलेले सभासद, सेवानिवृत्त सभासद व पाल्यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते. पुष्पा नेसरीकर यांनी स्वागत केले. वाघमोडे म्हणाले, रवळनाथ परिवारातील मंडळींनी खेड्यातील मुलांसाठी गडहिंग्लजमध्ये सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिकेसह झेप ॲकॅडमीदेखील मोठ्या शहरातील व्यावसायिक ॲकॅडमींना लाजवणारी आहे. तहसीलदार विनोद रणावरे म्हणाले, रवळनाथची बँकिंग व्यवसायाबरोबरच शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद आहे. यावेळी गायत्री गावडे, आदिती घोरपडे, अक्षय कोकीतकर, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी एम. टी. कांबळे, सभासद नारायण सुतार, वयाची पंचाहत्तरी पूर्ण झालेले सभासद वसंत पेडणेकर, रोहिणी देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कांबळे, राजेश घोरपडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, नारायण काणेकर, चंद्रकांत दुगानी, जयवंत कोकीतकर, सविता चौगुले, संपदा चौगुले, दीपक शिंदे आदी उपस्थित होते.